## प्रकरण - चौथे

## ब्रिटीशकालीन सरदार पाटणकर घराणे

**प्रस्तावना :-**

स्वराज्याची निर्मिती करीत असता छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्यातील लोकांमध्ये अस्मिता निर्माण केली. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला आणि स्वातंत्र्याची संकल्पना त्यांच्या मनात रूजविली. त्यांनी उभारलेल्या स्वराज्याचे पुढे साम्राज्यात रूपांतर पेशव्यांच्या काळात सरदार पाटणकर आणि इतर सरदारांच्या पराक्रमामुळे झाले. अनेक मराठा सरदारांना त्यांच्या कर्तृत्वाला वाव मिळत जाऊन उत्तरेकडे मोगली इलाख्यात मराठयांचे वर्चस्व वाढत जाऊन दिल्लीच्या तक्तालाही मराठयांच्या मदतीची आवश्यकता भासू लागली. तत्कालिन संपूर्ण हिंदुस्थानाचा विचार करिता मराठयांचा निर्धोकपणे वावर सर्वत्र असलेला आपणांस पहावयास मिळतो. यातून परकीय आक्रमकांविरोधात दिल्ली दरबाराला मराठयांची गरज आहे, हे ओळखून मराठयांनी दिल्लीकडे कूच केली आणि पुढे पानिपतचे तिसरे युध्द झालेले दिसून येते. उत्तर पेशवाई कालखंडात पेशव्यांतील अंतर्गत कलहामुळे तसेच अनेक मातब्बर मराठा सरदारांतील दुहीमुळे मराठा साम्राज्य ब्रिटीशांनी गिळंकृत केले.

इ.स.१८१८ मध्ये पेशव्यांचा इंग्रजांनी पराभव केला आणि पुण्याच्या शनिवारवाडयावर युनियन जॅक फडकविला. इंग्रज सरकारच्या हाती जवळजवळ सर्व हिंदुस्थानची सत्ता आली. सर्व राज्याचा बंदोबस्त करून पेशव्यांचा राज्यकारभार इंग्रज सरकारने घेतला. या काळात सरदार पाटणकर घराण्यातील व्यक्तीं या आपआपल्या जहागिरींचा पाटण (सातारा) वगैरे ठिकाणी राहून उपभोगताना दिसून येतात. पेशवाईच्या अस्तानंतर आलेल्या ब्रिटीश राजवटीत मात्र या घराण्याला कर्तृत्व दाखविण्यास वाव मिळाला नाही. तरीसुध्दा

जिथे जिथे त्यांना संधी मिळाली तिथे तिथे त्यांनी आपले कर्तृत्व सिध्द करून दाखविले. सरदार पाटणकर घराण्यातील काहींनी ब्रिटीशांची सेवा पत्करली तर काहींनी ब्रिटीशांच्या विरोधात बंड करून आपले अंगभूत शौर्य दाखविले.

ब्रिटीशांनी इ.स. १८१८ मध्ये सालीना पेन्शन योजना लागू केली.[१] यामध्ये तत्कालिन राजे, सरदार, जहागीरदार, काही वतनदार यांचा समावेश करण्यात आला. त्यानुसार मि.एल्फिन्स्टन यांनी सरदार पाटणकर घराण्यातील बाजीराव पाटणकर यांना सालीना तीन हजार रूपयांची पेन्शन मंजूर केली होती.[२] याच सरदार पाटणकर घराण्यांतील बाजीराव पाटणकर पेशवे दरबारी आपल्या कर्तृत्वास वाव न मिळाल्याने नागपूरच्या मुधोजी भोसले यांच्याकडे गेले होते.[३] पराक्रमाच्या जोरावर त्यांनी नागपूरकर भोसले यांच्या दरबारी मानाचे स्थान मिळविले होते. पुढे दुसरे बाजीराव पेशवे यांनी सरदार बाजीराव पाटणकर यांना पुणे दरबारी आणून मौजे तांबडे हा गांव इनाम दिला होता.[४]

मराठयांच्या दृष्टीने महत्त्वाची बाब म्हणजे, इ.स. १८१८ मध्ये मि.एल्फिन्स्टन यांनी छत्रपती प्रतापसिंह यांना सातारा राज्य अधिकारावर कायम केले. त्यांना १२ लक्ष रूपयांचा प्रदेश नेमून दिला.[५] छत्रपती प्रतापसिंहांनी जे त्यांच्या लोभात वागत होते. त्यांना देणग्या, बक्षिसी दिल्या. यामध्ये पाटण घराण्यांतील ज्योत्याजीराव पाटणकर यांना छत्रपतींकडून रू. १,०००/— बक्षिसी रूपात मिळाले.[६]

दिनांक १२ मार्च, १८२२ रोजीचे साताऱ्याचा इंग्रज प्रतिनिधी ग्रॅंट डफ यांनी सरदार नागोजीराव पाटणकर यांना पाठविलेले पत्र उपलब्ध आहे.[७] 'मेहेरबान दोस्तां' या शीर्षकाचे व मुरारी रामोशीचा बंदोबस्त करण्याविषयीचे पत्र उपलब्ध आहे. मजकूर पुढीलप्रमाणे, '.....दिगर मुरारी रामोसी जमीयेत करून फिरत आहे. अद्यापी कोठे लुटलयाचे जाहिर जाले नाही लेकीन त्याचे बंदोबस्ता करीता श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब यांचे सरकारातून

मेहेरबा रामराव मोहिते वगैरे याज बरोबर लोक देऊन रवाना जाले आहेत. ते तलाश करितील आपणही या बदल बहूत तऱ्हेने बातमी लाऊन रामोसी याज धरावे. पलो लागल्यास बेलाशक गोली घालून ठार मारावे. बातमी कलेल ती वरचेवर मोहिते यास खबर करून मदत करावी व मुरारी रामोसी याचे दावेदारी तिकडे असतील त्यास येथे पाठवून द्यावे.....'.[८] छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या आदेशाने रामराव मोहिते हे मुरारी रामोशीच्या बंदोबस्तासाठी निघाले आहेत. त्यांना तुम्ही सहकार्य करून त्यांच्याशी सल्लामसलत करीत जाणे. म्हणजेच, सरदार पाटणकर यांच्या युध्दविषयक कौशल्याचा तसेच त्यांच्या अनुभवाचा सल्ला दुसऱ्या सेनानींना मिळावा, अशी अपेक्षा इंग्रंजाकडून व्यक्त होताना दिसून येते.

सरदार नागोजीराव पाटणकर यांचा मृत्यू इ.स. १८२२मध्ये झाला. नागोजीराव पाटणकर यांच्यानंतर व्यंकटराव पाटणकर हे पाटण जहागिरीची व्यवस्था पाहू लागले.[९] इ.स. १८२३ मध्ये सातारच्या श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी पाटण महालास भेट दिली.[१०] छत्रपतींच्या सन्मानार्थ व्यंकटराव पाटणकर यांनी मोठा दरबार भरवून सत्कार केला होता. सरदार पाटणकर घराण्यांच्या दृष्टीने हे महत्त्वाचे आहे. कारण तत्कालिन परिस्थितीचा विचार करता छत्रपतीने एखादया सरदाराला भेट दिलेली दिसून येत नाही. परंतु खुद्द छत्रपतींच्या भेटीमुळे सरदार पाटणकरांना विषयी छत्रपतींच्या मनातील प्रेम अधोरेखित होते.

इ.स.१८२६ मध्ये कोल्हापूरचे छत्रपती बुवासाहेब महाराज यांनी पाटण महालाला भेट दिली होती.[११] छत्रपतींनी मुक्काम करून पाटण महालांचे किंबहुना सरदार व्यंकटराव पाटणकरांचे आगत्य स्वीकारले होते. यावेळीही सरदार पाटणकर यांनी छत्रपतींच्या सन्मानार्थ खास दरबार भरवून भव्य सत्कार केला होता. सरदार पाटणकर घराण्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बाब म्हणजे विभागलेल्या मराठा राज्याचे दोन्हींही रियासतीचे वारसदार यांनी पाटण

महालाला भेट दिली होती. सरदार पाटणकर घराण्याला मिळालेला हा मान क्वचितच दुसऱ्या एखादया सरदाराला मिळालेला दिसून येतो.

दिनांक १७ नोव्हेंबर, १८२७ रोजी व्यंकटराव पाटणकरांना सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी बंडवाल्यांचा बंदोबस्त करण्याविषयी एक आज्ञापत्र पाठविले होते.[१२] या आज्ञापत्रातील मजकूर पुढीलप्रमाणे, 'चोरटे बंड वाले लोक पाटण महालांत येतील तर त्यांना धरून मारावे व त्यांच्या आश्रयाचे किल्ले, जागा वगैरे असल्यास भिंती पाडून टाकाव्या.'[१३] यातून आपणांस तत्कालिन परिस्थितीचा अंदाज येतो. सर्वत्र बेदिलीचे वातावरण असलेले दिसून येते. थोडक्यात पेशवाई अस्तानंतर लष्करी कारवाया थंडावल्यामुळे चोरटे, बंडवाले जे की स्वकीय असूनही स्वकीयांविरूध्द लुटमार करीत असत परंतु अशा बंडवाल्याचा बंदोबस्त सरदार व्यंकटराव पाटणकरांनी केलेला दिसून येतो.

एप्रिल, १८३० मध्ये सातारच्या छत्रपतींनी पुन्हा व्यंकटराव पाटणकर यांना आज्ञापत्र लिहून, तुम्ही मोठया शूरत्वानें बंडवाल्यांचा मोड करून चोहोंकडे स्वस्थता राखिली,[१४] याबाबत लिहिले आहे. यावरून असे दिसून येते की, सरदार पाटणकर घराण्याचे वर्चस्व पाटण महालात कायम राहिले. बंडवाल्यापासून पाटण महालाचे संरक्षण केल्याबद्दल छत्रपतीकडून त्यांची प्रशंसा झालेली दिसून येते. तत्कालिन अस्थिर परिस्थितीमध्ये त्यांनी केलेल्या कामगिरीची दखल छत्रपतींना घ्यावी लागली, ही बाब सरदार पाटणकर घराण्यांच्या इतिहासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची आहे.

सरदार व्यंकटराव पाटणकर ऊर्फ आबासाहेब यांची सावंतवाडी मेमोयरमध्ये बरीच सुस्ती केली आहे. ते सावंतवाडी स्टेटचे खाजगी कारभारी होते[१५] व आपल्या सेवाकालादरम्यान त्यांनी सरकारला चांगले सहकार्य देऊन त्यांची प्रशंसा मिळविली. यासंदर्भात उतारा पुढीलप्रमाणे,

‘Venkut Rao Alias Abasaheb Patankar, the present Khasgi (Khangi) Karbharee, is a Native Gentleman of high and honorable character and has always use his best endeavours to promote the good government and best interests of the state, from our first connection with Waree in 1838, four Political Superitendents have borne testimony to the high sense entertained of his services, as well as to his intelligence, conciliatory disposition, and general upright behaviour in all matters relating to the welfare of the people and country. He is a person in whom every confidance may be placed; he rendered good and faithful service to Government during the rebellion in 1844 and 1845; and it is recorded that he made himself equally useful during the earlier distrubances in 1838-39; in a word, his conduct has been honest and straight-forward from first to last in his relations with us, and he is entitled to all credit and consideration, which he has fairly and justly earned by a long course of faithful Services.’[१६]

याचा मराठीत अनुवाद पुढीलप्रमाणे, ‘व्यंकटराव ऊर्फ आबासाहेब पाटणकर —सध्याचे खासगी (खानगी) कारभारी हे उच्च आणि सन्मान्य नीतिमत्तेचे सािनिक गृहस्थ आहेत आणि त्यांनी नेहमीच शासनाची गुणवत्ता वाढावी आणि राज्याचे अधिकाधिक हित व्हावे हयासाठी भगीरथ प्रयत्न केलेले आहेत. इ.स. १८३८ मध्ये जेव्हा आमचा परस्परांशी प्रथमच ‘‘वाडी’’ (सावंतवाडी) च्या निमित्ताने संबंध प्रस्थापित झाला, तेव्हापासून ते अखंडपणे आमच्याबरोबर आहेत. चार राजकीय निरीक्षकांनी त्यांच्या ठिकाणी असलेली उच्चप्रतीची सेवाभावना, बुध्दिमत्ता, विचारविनिमय करण्याची, विचारांची देवाणघेवाण करण्याची स्वाभाविक प्रवृत्ती, त्याचप्रमाणे देश व जनता यांच्या कल्याणाशी निगडीत असलेल्या सर्व बाबींमध्ये त्यांनी अंगिकारलेले

सर्वसाधारण व सरळपणे वागण्याचे धोरण या संबंधात साक्ष दिलेली आहे. कोणीही पूर्णपणे त्यांच्यावर विश्वास ठेवावा अशाच व्यक्तिमत्त्वाचे ते एक गृहस्थ आहेत. इ.स. १८४४ व इ.स. १८४५मध्ये झालेल्या बंड—बंडाळीच्या काळात त्यांनी चांगली प्रामाणिक सेवा (तत्कालीन) शासनाला रूजू केलेली आहे. शासनाच्या अभिलेखात असाही उल्लेख आलेला आहे की, त्याही पूर्वी—म्हणजे इ.स. १८३८—३९ मध्ये निर्माण झालेल्या अशांततेच्या वातावरणात देखील त्यांनी तितक्याच तोडीची उपयुक्त कामगिरी बजावलेली आहे. थोडक्यात सांगायचे तर, आमच्याशी त्यांचे संबंध जुळले तसे तेव्हापासून अखेरपर्यंत त्यांचे वर्तन हे प्रामाणिकपणाचे व साधे—सरळपणाचे राहिलेले आहे. म्हणून तर ते सर्व श्रेयाचे धनी आहेत, सर्वप्रकारच्या सोयी—सवलतींचे—लाभांचे मानकरी आहेत. त्यांनी सदरचे श्रेय व लाभांच्या मानाचे पान, प्रदीर्घकाळ निष्ठापूर्ण सेवा रूजू करून, प्रामाणिकपणे व न्याय्यरीतिने मिळविलेले आहे.'

महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सरदार घोरपडे घराण्याचे योगदान उल्लेखनीय आहे. याच घराण्यातील वंशज रामचंद्रराव घोरपडे (दुसरे) यांना करवीर रियासतीचे सेनापती पद वंशपरंपरेने मिळाले.[१७] यावेळी कोल्हापूरच्या गादीवर छत्रपती बुवासाहेब महाराज होते. छत्रपती बुवासाहेब महाराजांची कन्या श्रीमंत आऊबाई आक्का यांचा विवाह सरदार पाटणकर घराण्यातील रामचंद्रराव पाटणकर यांचेशी दिनांक १८ मार्च, १८४६ रोजी ठरविण्यात आला होता.[१८] यासंदर्भात सेनापती रामचंद्रराव घोरपडे (दुसरे) यांना छत्रपतींकडून पाठविलेले निमंत्रण पहावयास मिळते. या निमंत्रणाचा मजकूर पुढीलप्रमाणे, 'समस्त सेना धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री रामचंद्रराव घोरपडे सेनापती यासी आज्ञा केली ऐसीजे चिरंजीव आऊबाई आक्का यांचे विवाहाचा निश्चये फाल्गून बहुल पंचमीस सौम्यवारी होऊन वरराज श्री.रामचंद्रराव पाटणकर यासी नेमस्त केले आहेत. त्या समारंभास परिवारासह आपणास निघोन येणेची आज्ञा झाली आहे. तरी आज्ञाप्रमाणे लग्नसमारंभास निघोन यावे....'.[१९]

इ.स. १८४४ मध्ये पन्हाळा किल्ल्यावर बंडवाल्यांनी हल्ला केला. त्यावेळी कोल्हापूरचे छत्रपती बुवासाहेब महाराज हे पन्हाळगडावर होते. तेव्हा सरदार रामचंद्रराव पाटणकर यांना ही बातमी समजताच त्यांनी पन्हाळा किल्ल्यावर तातडीने जाऊन छत्रपती महाराजांचे रक्षण केले.[२०] छत्रपतींना बंडवाल्यांकडून कोणताही उपद्रव होऊ नये, म्हणून काळजी घेतलेली दिसून येते. पुढे सामानगडावर ब्रिटीशांच्या विरोधात गडकऱ्यांनी बंड केले.[२१] बंडाच्या वेळेस कोल्हापूर येथील इंग्रंज धार्जिण दाजी पंडित यांच्यावर बंडखोर लोकांनी हल्ला केला. त्यावेळी सरदार रामचंद्रराव पाटणकर यांनी मध्यस्थी करून दाजी पंडित यांचा बचाव केला.[२२] यामागचे कारण असे की, दाजी पंडित याच्या संरक्षणासाठी इंग्रजी फौजा कोणत्याही क्षणी कोल्हापूरमध्ये दाखल होणार होत्या. यामुळे कोल्हापूर शहराची किंबहुना छत्रपतींची स्वायत्तता धोक्यात येणार होती. म्हणून दाजी पंडित याचा बचाव करून सरदार पाटणकरांनी इंग्रंजाशी होणारा संघर्ष टाळला होता, असे आपणांस दिसून येते.

सरदार पाटणकर घराण्यातील ग्वाल्हेर येथे स्थायिक झालेले सरदार रामचंद्रराव ऊर्फ आप्पासाहेब पाटणकर यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर ग्वाल्हेर संस्थानांशी चांगले संबंध प्रस्थापित केले. इ.स. १८५६ मध्ये ते ग्वाल्हेर संस्थानिकांसोबत ते कलकत्यास गेले होते.[२३] त्याप्रसंगी त्यांना एक घोडा, हत्ती, हिऱ्यांची कंठी, मोत्याचा तुरा आणि मानाचा पोषाख देण्यात आला होता.[२४]

ब्रिटीश आमदनीत जाज्ज्वल देशभक्ती व मातृभूमीच्या प्रेमाने भारलेल्या महाराष्ट्रातील असंख्य तरूणांचे व निधडया छातीच्या सशस्त्र क्रांतिकारकांचे पाटण हे स्फूर्तिस्थान होते. इंग्रजांविरोधी गुप्त सल्लामसलतीची, त्यांच्याविरूध्द कटकारस्थान करण्याची, प्रसंगी लपण्याची व गावठी हातबॉम्ब करण्याची ती महत्त्वाची पण दुर्लक्षित अशी ठिकाणे होती. सामर्थ्यवान ब्रिटीश राजवटीला कसा सुरूंग लावायचा याचे षडयंत्र तेथे रचले

व भूमिगत क्रांतिकारकांच्या तेथे महत्त्वपूर्ण भेटीगाठी होत. सरदार पाटणकर घराण्यांतील मणदुरे, परगणे पाटण येथील बापूसाहेब पाटणकर यांनी ब्रिटिशांविरोधी उठाव केला होता.[२५] हे बंड इ.स. १८५७च्या प्रसिध्द बंडाअगोदर केले होते.

ब्रिटीश सरकारविरूध्द पाटण परगण्यातील जनतेला चळवळ करण्यास चिथवण्याचे काम बापूसाहेब पाटणकर यांनी केले होते.[२६] पाटणवरून हेळवाक घाटातून घोडयावरून महसुली लुट घेऊन जाणाऱ्या ब्रिटीश अधिकाऱ्याला बापूसाहेब पाटणकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी जेरबंद करून त्याच्याजवळील संपत्ती जप्त केली.[२७] त्या संपत्तीचा विनियोग त्यांनी पुढे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंग्रामात केला. ब्रिटीशांविरोधात अनेक कट कारस्थाने केल्यामुळे ब्रिटीशांनी त्यांना त्यांच्या मणदुरे, परगणे पाटण इलाख्यातून पाच वर्षासाठी हद्दपार केले होते.[२८] हद्दपारीची शिक्षा भोगून परत आल्यानंतर बरीच वर्षे बापूसाहेब पाटणकर हे भूमिगतच होते व अखेरपर्यंत भूमिगतच राहून त्यांनी आपला ब्रिटीश सत्तेविरूध्दचा संघर्ष चालूच ठेवला.

हिंदुस्थानात पूर्वी राजा असलेले हक्क, अधिकार उपभोगणारे, सरदार पाटणकर हे मोठया योग्यतेचे व अधिकाराचे घराणे म्हणून सर्वत्र प्रसिध्द होते. शिवकालीन, पेशवेकालीन तसेच आंग्लकालीन राजवटीत पाटणकर घराण्यास नाईक, शिलेदार, सरकिल्लेदार, किल्लेदार, गडकरी, तटरक्षक, द्विसहस्त्री, सेनापंचसहस्त्री, सेनालष्करसहस्त्री, पागेची पंचसहस्त्री, मुजरा माफी सरदार, राजाच्या उजव्या बाजूस हत्तीच्या सिंहासनावर बसणारे मानकरी,[२९] पंचकुलीन क्षत्रिय परगणेदार, दर्यासारंग, सवाई सुभानराव, सरलष्कर, मेजर, सरदार, फर्स्ट क्लास सरदार ऑफ दख्खन, शिक्केकरी, समशेर बहाद्दर यासारखे अनेक मानसन्मान व बहुमान प्राप्त झाले होते.[३०] वरील काळात काही मानाचे लष्करी हुद्दे त्यांना त्यांच्या खास लष्करी शौर्यकृत्याद्वारे प्राप्त झाले होते.

बादशाही अंमलापासून हया राजवंशीय घराण्यात चालत आलेले अनेक मानसन्मान व अधिकार पूर्वीपर्यंत कायम होते. त्या काळात सातारा आणि कोल्हापूर या छत्रपतींच्या राजघराण्यांशी त्यांचे घरच्यांसारखे संबंध असल्यामुळे, सरदार पाटणकरांस पायांत सुवर्णालंकार घालण्याचा पूर्वापार हक्क होता[३१] व दोन्ही छत्रपतींच्या बरोबर उजव्या बाजूस आसन घालून चांदीच्या ताटात भोजन करण्याचा अधिकार या घराण्यास होता.[३२] तसेच मोराच्या पिसांच्या चवऱ्या, पालखी, भालदार, बारलीच्या आब्दागिऱ्या व डंका आणि स्वारीबरोबर जाणे झाल्यास जरीपटक्याचे पुढे चालण्याचा मान सरदार पाटणकर घराण्याकडे पूर्वापार होता.[३३]

सावंतवाडीच्या सावंत—भोसले राजघराण्याशी सरदार पाटणकर घराण्याचे फार जवळचे संबंध होते. सावंतवाडीच्या संस्थानातून पाटणकर घराण्यास सरदारकी व मेहमान किताब बहाल करण्यात आले.[३४] सावंतवाडीप्रमाणेच ग्वाल्हेर राजघराण्याशीही सरदार पाटणकर घराण्याचे नातेसंबंध होते.

सरदार पाटणकर घराण्यांत मूळ पुरूषापासून पहिल्या प्रतीच्या सरदारांच्या पटांत नांवे बादशही अमलांपासून दाखल आहेत.[३५] त्याबद्दल करवीर सरकारच्या दप्तरांत व साताराच्या दरबारांत तक्ते व यादया उपलब्ध आहेत, कारण या घराण्यांतील एकंदर पुरूषांनी मोठमोठया लढाया व पराक्रम करून, कर्नाटक वगैरे प्रदेशात शूरत्वांची कृत्ये करून यश मिळविले होते. मेजर ग्रॅहमसाहेब यांनी इ.स. १८५४ साली मुंबईसरकारास जो स्टॅटिस्टिकल रिपोर्ट सादर केला. यात सरदार पाटणकर घराण्यातील रामचंद्रराव पाटणकर यांचे नाव महाराज सरकारचे उजव्या बाजूस असून त्यांच्या नावासमोर कोष्टकांत पहिल्या प्रतीचे सरदार हा हुद्दा लिहिला आहे.[३६]

सरदार पाटणकर घराण्यातील जहागिरीच्या अधिकारारूढ, साहेबबहादुरास मा.गव्हर्नरसाहेबांची मुलाखत घेणे झाल्यास त्यांस

२१ मोहोरांचा नजराणा दयावा लागत असे.[३७] या भेटीदरम्यान मा.गव्हर्नर साहेब सरदार पाटणकरांना परतभेट म्हणून ५ वस्त्रे देण्याची वहिवाट होती.[३८] गव्हर्नरसाहेबांचे सेक्रेटरी यांनी यांस सामोरे येऊन गव्हर्नरसाहेब यांनी उठून मान देण्याची चाल होती.[३९] तसेच इंग्रज सरकारच्या सेवेतील पॉलिटिकल एजंट, कलेक्टर, कमिशनर, न्यायाधीश व अन्य लहान–मोठे अधिकारी यांनी सरदार पाटणकर यांस सामोरे येऊन भेट घेण्याची व परत भेट देण्याची पध्दत होती.[४०] पोलिसी अधिकाऱ्यांना सरदार पाटणकरांना कामाच्या संदर्भात भेट घ्यायची असल्यास त्यांनी प्रथम आपला पट्टा काढून बादशाही शिरस्त्याप्रमाणे मानाचा मुजरा करून हुकूम झाल्यानंतर आसनस्थ व्हावे असा पूर्वापार दंडक होता.[४१]

सरदार पाटणकर जेव्हा बाहेर फिरण्यास जात तेव्हा त्यांच्या सरबराईकरता त्यांचा योग्य तो मान, सन्मान राखण्यासाठी मा.गव्हर्नरसाहेब, मुंबई यांच्यासार्फत संबंधित प्रशासनास हुकूम सादर व्हावा असे मलिका माआझमा, इंग्लिस्तान यांच्या संमतीने झालेल्या करारनाम्यात स्पष्ट होते.[४२] ब्रिटीश कालखंडात किल्ले गगनगड व शिवगडावर पूर्वीपासून तैनात असलेले सरदार पाटणकर कुळाचे व संबंधित उपकुळांचे अंदाजे ३५० मानकरी, किल्लेदार, गडकर, भालदार, चोपदार हे सरदार पाटणकर यांच्या सरंजामात होते.[४३]

स्वराज्य स्थापन करण्यापूर्वी या प्रतिष्ठित घराणेदारांकडे इतर श्रीमंत सरदार, जहागीरांप्रमाणेच जुन्या बनावटीचा तोफा, बंदुका, ढाली, तलवारी, धनुष्य, हत्यारे, चांदी–सुवर्णाची नाणी, किंमती रत्नांचे दागिने, प्राचीन श्री देवदेवतांच्या मूर्ती, नक्षीदार भांडी, ऐतिहासिक सुवर्ण, ताम्रपत्र, राजवस्त्र[४४] यांसारख्या अनेक ऐतिहासिक चीजवस्तू आपणांस सरदार पाटणकर घराण्यांकडे पहावयास मिळतात. सरदार पाटणकर घराण्याचे निशाण पिवळया रेशमी वस्त्रांचे होते. तसेच त्यांचा पोषाखही पीतवर्ण होता.[४५]

सरदार पाटणकर घराण्यातील रामचंद्रराव पाटणकर यांचे पुत्र नागोजीराव ऊर्फ तात्यासाहेब पाटणकर हे कोल्हापूर छत्रपती शिवाजी (तिसरे) भोसले महाराज ऊर्फ बाबासाहेब महाराज यांचे जवळ सतत रहात असत.[४६] दिनांक ३० सप्टेंबर, १८६५ रोजी छत्रपती बाबासाहेब महाराजांनी मोठा दरबार भरवून नागोजीराव पाटणकर यांना सोडतीन वस्त्रें देऊन 'मनसूबबहाद्दूर' असा किताब दिला.[४७] इ.स. १८६६ मध्ये छत्रपती बाबासाहेब महाराजांना पुत्रसंतती नसल्यामुळे त्यांनी नागोजीराव पाटणकर यांना दत्तक घेतले[४८] आणि त्यांचे नामकरण राजाराम महाराज असे करून कोल्हापूरचे राज्याधिपती केले.[४९]

रामचंद्रराव पाटणकर यांना दुसरे पुत्र नसल्याने त्यांनी श्रीमंत बाजीराव पाटणकर यांचे पुत्र जोत्याजीराव यांना दिनांक २९ मे, १८६८ रोजी दत्तक घेतले[५०] आणि त्यांचे नागोजीराव ऊर्फ बाबासाहेब असे नामकरण केले. वयाच्या ६व्या वर्षापासून ते कोल्हापूरात रामचंद्रराव पाटणकर यांच्या वाडयांत राहत असत. त्यांचे शिक्षण नागोजीराव ऊर्फ तात्यासाहेब यांच्याप्रमाणे गणेशबागेतील शाळेत झाले.[५१] ही शाळा छत्रपती बाबासाहेब महाराजांनी राजपुत्र व इतर सरदारपुत्रांकरिता गणेशबागेमध्ये स्थापन केली होती.

नागोजीराव ऊर्फ तात्यासाहेब आणि जोत्याजीराव यांनी या शाळेत घोडेस्वारी सरकारी वस्ताद मिरासाहेब व समनभाई यांच्याकडून शिकून घेतलेली होती.[५२] दांडपट्टा, खड्गविद्या वस्ताद जमालभाई यांच्याकडून शिकून घेतले.[५३] तर अचुक निशाण मारण्याची कला नानासाहेब इंगळे यांच्याकडून प्राप्त करून घेतली.[५४] पुढे छत्रपती बाबासाहेब महाराज यांनी जोत्याजीराव पाटणकर यांना वेळोवेळी आपणांसोबत शिकारीस नेल्याचे दिसून येते. त्यांचे शिकारीतील कौशल्यामुळे छत्रपती बाबासाहेब महाराजांची विशेष मर्जी त्यांच्यावर होती.[५५] छत्रपती बाबासाहेब महाराज, पोलिटिकल एजंट हॅवलाक साहेब आणि इतर सरदार मंडळी यांच्यासोबत जोत्याजीराव पाटणकर

हे पंत प्रतिनिधींच्या व पंत अमात्यांच्या मुखत्यारीच्या समारंभाच्यावेळी मलदापुरास व बावडयास गेले होते.[५६] तेव्हा या संस्थानाधिपतींनी जोत्याजीराव पाटणकर यांचा विशेष सत्कार केला होता.

छत्रपती राजाराम महाराज ऊर्फ नागोजीराव यांना दत्तक घेतल्याबद्दल सरदार पाटणकर यांच्या घराण्यांचा गौरव समस्त मराठा राज्यामध्ये वाढलेला दिसून येतो. ऐतिहासिक वारसा आणि वसा, गौरवशाली परंपरा, शूर, पराक्रमी, संघटनकुशल या बाबींमुळे खुद्द कोल्हापूरचे छत्रपती बाबासाहेब महाराज यांना या घराण्यांची दखल घ्यावीशी वाटली आणि आपला उत्तराधिकारी म्हणून या घराण्यांतील नागोजीराव पाटणकर यांची निवड केली. या घटनेमुळे मे.अंडरसनसाहेब, माजी पोलिटिकल एजंट यांनी सरकारास रिपोर्ट केल्यावरून दिनांक १० सप्टेंबर, १८६८साली इतर जहागिरदार लोकांकडून सरकारने शेकडा १५ रूपये नजराणा घ्यावा व सरदार पाटणकर यांजपासून शेकडा ५ रूपये घ्यावा, असा ठराव करण्यात आला.[५७] म्हणजेच सरकारनेही या घराण्यांतील नागोजीराव पाटणकर हे कोल्हापूर गादीचे तक्ताधिपती झाल्याचे गौरवार्थ या घराण्याला सरकारास जमा करावयाच्या नजराण्यातून सूट दिलेली दिसून येते.

इ.स. १८६८ मध्ये जोत्याजीराव ऊर्फ बाबासाहेब पाटणकरांना दत्तक घेतल्यानंतर पाटण जहागिरीच्या कारभाराची सर्व व्यवस्था कोल्हापूर सरकारचे खासगी कारभारी यांच्या देखरेखीखाली गोविंदपंत काळे व प्रल्हाद नाईक भुरे हेच पहात होते.[५८] बाबासाहेब पाटणकर यांची हुशारी, कामाकाजाची दक्षता, नियमितपणा व व्यवस्थितपणा वगैरे गुण पाहून ते आपल्या जहागिरीचा कारभार करतील, अशी त्यावेळच्या पोलिटिकल एजंट अंडरसन यांची पूर्ण खात्री झाल्यामुळे त्यांनी जहागिरीचा स्वत: पूर्ण मुखत्यारींने कारभार करण्याचा अधिकार इ.स. १८६९ मध्ये जोत्याजीराव ऊर्फ बाबासाहेब

पाटणकरांना दिला गेला.[५९] कोल्हापूर इलाख्यात त्यांच्या गावापुरता दिवाणी ५००० रूपयेपर्यंत रक्कमेच्या दाव्याचा निकाल करण्याचा व फौजदारींत मॅजिस्ट्रेटचा व मुलकीत कलेक्टरचा व पोलिसांत चीफ पोलिस, असे अधिकार देण्यात आले.[६०]

पुढे इ.स.१८७३ मध्ये मुंबई सरकारने ठराव करून त्यांचे नांव पहिल्या प्रतीच्या सरदारांच्या पटात पूर्वीप्रमाणे दाखल केले.[६१] तसेच याचवर्षी पाटण तालुक्यांतील त्यांच्या गांवापुरता मॅजिस्ट्रेटचा अधिकार मुंबई सरकारच्या ठरावावरून त्यांना मिळाला. सरदार पाटणकर यांना कोर्टात जाण्याची माफी होती. साक्ष देण्याचे कारण पडल्यास कमिशन मार्फत किंवा न्यायाधीशांनी त्यांच्या वाडयात येऊन साक्ष घेण्याची वहिवाट होती.[६२]

श्रीमंत बाबासाहेब पाटणकर यांच्या निमंत्रणावरून कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांची स्वारी दिनांक २० एप्रिल, १८९२ रोजी पाटण येथे लवाजम्यासह गेले होते.[६३] त्यावेळी पाटण जहागीरीत छत्रपतींचे स्वागत करण्यासाठी संपूर्ण शहर सुशोभित करण्यात आले होते. यावेळी बाबासाहेब पाटणकर यांची छत्रपतींना सलामी देताच वहिवाटीप्रमाणे महाराजांकडून बाबासाहेब पाटणकर यांना भरजरी दुपेटा देण्यात आला होता.[६४] तसेच बाबासाहेब पाटणकर यांच्याकडून छत्रपतींना एक मंदील, दुपेटा व किनखापा भरजरी तागा आणि मलमलींची दोन ठाणें अशी चांदीचे ताटात घालून देण्यात आले होते.[६५] महाराजांच्या लवाजम्यातील सर्व सरदार, कामदार वगैरे लोकांना मौल्यवान पोषाख देऊन शिपाई वगैरे यांस एकंदर ४०० ते ५०० पागोटी देण्यात आली होती.[६६]

या भेटीवरून असे दिसते की, कोल्हापूरच्या छत्रपतींची सरदार पाटणकरांवर विशेष अशी मर्जी होती. वैवाहिक संबंध प्रस्थापित झाल्यामुळे त्यांच्यातील नाते अधिक दृढ झाले होते. तत्कालिन छत्रपती आणि सरदार यांच्या भेटीदरम्यान होणाऱ्या परंपराविषयी, सरदार पाटणकरांच्या मानमरातबांची आपणांस

इथे माहिती मिळते. तसेच महाराजांच्या लवाजम्याविषयी तसेच त्यांच्या राहणीमानाविषयी अधिक माहिती आपणांस यावरून दिसते.

सातारा जिल्हयातील तत्कालिन सेटलमेंट ऑफिसर मे. आर्थरसाहेब यांची स्वारी पाटण जहागिरींतील कारवटचे जंगल येथे शिकारीसाठी गेले असता, अपघाताने त्यांना त्यांच्याच शिपायाची गोळी लागली. त्यांना तातडीच्या उपचाराची गरज होती. ही बातमी बाबासाहेब पाटणकर यांना कळतांच त्यांनी स्वत: मेणा, भोई वगैरे घेऊन जाऊन आर्थरसाहेबांना पाटणला आणले. साताऱ्यास तार करून बाबासाहेब पाटणकरांनी डॉक्टर उपचारासाठी आणिला. योग्य उपचार झाल्यावर आर्थरसाहेबांना महाबळेश्वरला पाठविले.[६७] या घटनेतून सरदार पाटणकर यांच्या ठायी असणारा मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो. संकटसमयी मदतीस धावून जाण्याचा ऐतिहासिक वारसा सरदार बाबासाहेब पाटणकरांनी जपलेला दिसून येतो.

सरदार नागोजीराव ऊर्फ बाबासाहेब पाटणकर यांनी आपल्या दौलतीत जवाहीर, सुवर्ण व मौक्तिकांचे अलंकार खरेदी करून नवीन सांप्रदायाप्रमाणे थोर लोकांनी वापरावयाचे सामानसुमान खरेदी केले. बाबासाहेब पाटणकर यांच्या पदरी एकंदर ५०० लहान–मोठी मनुष्ये, कामगार, नोकर, आश्रित वगैरे मिळून होती.[६८] समवेत वाहने रथ स्वारांची घोडी, कोतवाल घोडी, मेणे, पालख्या, हालगी, डंका वगैरे सरंजाम होता.[६९] सरदार बाबासाहेब पाटणकर यांना ब्रिटीश सरकारातून २० हत्यारे मिळाली व करवीर सरकारांतून सरंजामास १०० हत्यारे मिळाली होती.[७०]

**पाटण जहागिरीची भौगोलिक व्याप्ती:**

सरदार पाटणकर घराण्यांतील मुळ पुरूषांनी वतने व जहागिरी स्वहस्ते मोठया हुशारीने व युक्तीने संपादन केली. इ.स. १५७२मध्ये विजापूरच्या सुलतानाकडून पाटण महालाची देशमुखी, इ.स. १६९० मध्ये

छत्रपती राजाराम महाराजांकडून पाटण महालापैकी अकरा गावे व कऱ्हाड तालुक्यापैकी एक गाव अशी मिळून बारा गावे संपादन केली.[७१] इ.स. १६९२ मध्ये संपूर्ण पाटण महाल मिळविला. नंतर या पाटण महालांत सर्व प्रकारे आपला अधिकार रहावा म्हणून या तालुक्यांत सरदेशमुखींचे वतन हिंदुराव घोरपडे यांजकडे चालत होते ते त्याजकडून काढून घेऊन इ.स. १६९६ मध्ये छत्रपती राजाराम महाराजांनी रामराव पाटणकरांना वंशपरंपरेने इनाम करून दिले.[७२] या घराण्याला पाटण तालुक्यांत गावाखेरीज देशमुखी, सरदेशमुखी, चौगुले, खोती व शेऱ्या आणि वतनी पाटिलकी वगैरे वतने मिळाली होती. करवीर इलाख्यातील नांदणी, सावर्डे, पिरळ ही इनाम गावे तसेच नांदणी गावात नायकी इनाम, तळाशी गावांत इनाम, नागाव कुरण, धरणगुत्तीमळहा व हुजूर शेतसनदी वगैरे वतनी हक्कांची वतने मिळाली होती.[७३]

सरदार पाटणकर यांच्याकडे पाटण तालुक्यांत ५८ गावाचा इनाम जहागीर म्हणून मिळाला होता. त्यापैकी ४३ गावे त्यांचेकडे आहेत. बाकीच्या गावापैकी दंतागिरीच्या किल्ल्याच्या खर्चासाठी १० व गुणवंतगडाच्या खर्चाकडे ४ अशी १४ गावे अदमांसे १५ हजार रूपये उत्पन्नाची जहागिरीतून तोडून दिली होती. मात्र चौदा गावच्या वाडयाच्या जागा व देशमुखींची वतने, मानपान, धनगरांवरील व देवस्थानावरील हक्क बाबासाहेब पाटणकर यांचेकडे चालू होते. या गावांतील नकद इनामाचा वसूल यांनाच मिळत होता.[७४]

मौजे सावर्डे, पिरंळ, नांदणी या तीन गावच्या जंगलाचा अधिकार सरकारकडून त्यांना मिळाला होता. तत्कालीन परिस्थितीचा विचार करता सरदार बाबासाहेब पाटणकर यांचे करवीर इलाख्यातील उत्पन्न अंदाजे वीस हजार रूपयाचे तर पाटण जहागिरीतील उत्पन्न बत्तीस हजार रूपयांचे होते.[७५]

**पाटण जहागिरीची भौगोलिक व्याप्ती:**

सरदार पाटणकरांकडे असलेल्या पाटण जहागिरीचे क्षेत्रफळ ६४ चौरस मैल (१६८ चौ.कि.मी.) होते. पैकी ८ चौरस मैल (२१ चौ.कि. मी.) खराब क्षेत्र, नदी, नाले, डोंगर, सडा वगैरेंनी व्यापलेले होते. २३ चौरस मैल (६० चौ.कि.मी.) जंगल क्षेत्र होते. देशमुखी वतन व शेरी या जमिनींनी व्यापलेले क्षेत्र २ चौरस मैल (५ चौ.कि.मी.) होते. जंगल, देशमुखी वतन, शेरी व खराब क्षेत्र सोडून उर्वरीत क्षेत्र ३० चौरस मैल (७८ चौ.कि.मी.) रयतेचे ताब्यात होते.[७६]

**जहागिर कारभार:**

ब्रिटीश कालखंडामध्ये सरदार पाटणकरांनी पाटण जहागिरीकडे विशेष लक्ष दिले होते. या जहागिरीचे व्यवस्थापन करताना सरदार पाटणकरांनी जहागिरीकडील कारभारावर मुख्य स्थानिक अधिकारी म्हणून कारभाऱ्याची नेमणूक केली होती.[७७] त्यांच्या हाताखाली अकौंटंट, हेडक्लार्क, शेरी कामगार, रेकॉर्ड किपर, जमाबंदी क्लार्क, बारनिशी क्लार्क, शेरी क्लार्क, इंजिनियर असा सेवक वर्ग नेमला होता. या व्यतिरिक्त मुलकी हवालदार, पट्टेवाला, खजिना गार्ड यांची नियुक्ती केलेली दिसून येते.[७८]

जहागिरीच्या कारभारी कार्यालयाबरोबर हुजूर कार्यालय त्याकाळात अस्तित्वात होते. या कार्यालयात हुजूर सेक्रेटरी व त्यांचे हाताखाली हुजूर पर्सनल क्लार्क अशी व्यवस्थाही केली होती. या जहागिरीच्या कारभारी कार्यालयामधील जी कामे, प्रकरणे श्रीमंत सरदार पाटणकरांच्या हुकूमासाठी, अवलोकनासाठी किंवा निर्णयासाठी ठेवायची ती प्रथम हुजूर कार्यालयामध्ये दाखल केले जाई. त्याची योग्य ती नोंद करून ती कामे हुजूर सेक्रेटरी मार्फत श्रीमंत सरदार पाटणकर यांच्यापुढे सुनावणीसाठी जात. या प्रकरणांवर पाटणकरांनी निर्णय घेतल्यानंतर, कार्यवाहीच्या योग्य त्या सूचना

हुजूर सेक्रेटरीला केल्या जात. या कार्यवाहीची सर्व सूचनापत्रे हुजूर कार्यालयाकडून कारभारी कार्यालयात दाखल होत असे. नंतर संबंधित क्लार्ककडून संबंधित व्यक्तींना ही सूचनापत्रे पाठविली जात असत.[७९]

सरदार पाटणकरांनी जहागिरीचे इ.स. १७९४पासूनचे सर्व रेकॉर्ड व्यवस्थितपणे जतन करून ठेवले आहे. त्याचे नगदी दप्तर, बारनिशी दप्तर, फॉरेस्ट दप्तर वगैरे विभागात वर्गीकरण केले आहे. प्रत्येक विभागात कायमचे दप्तर, ३५ वर्षाचे, १२ वर्षाचे, ३ वर्षाचे आणि चालू दप्तर असे पोटविभाग ही पाडले होते.[८०] आजही विविध विषयांचे रूमाल जहागिरीच्या दप्तरात पहावयास मिळतात.

**जहागिरींची आर्थिक स्थिती:**

पाटण जहागिरीकडे जमा होणारा पैसा रयतेकडून विविध करांच्या माध्यमांतून येत असे. सरदार पाटणकरांनी प्रतिवर्षी अंदाजे आवक आणि अपेक्षित अंदाजे खर्च यांचे अंदाजपत्रक तयार करवून घेत असत. या अंदाजपत्रकाची एकेक प्रत सर्व विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांकडे देण्यात येत असे. या अंदाजपत्रकांमध्ये अंदाजे आवक, खर्च आणि आगाऊ खर्चाची तरतूद केली जात असे. या पत्रकात कोणत्या खात्याला, किती खर्च, कोणाचे अधिकारात करणेचा आहे याची सविस्तर माहिती दिली जात असे. या अंदाजपत्रकांमध्ये पाटणकर कुटूंबियातील सदस्यानी किती खर्च करावयाचा याविषयी नियम करण्यात आले होते. समजा एखादया सदस्याकडून जादा रक्कम खर्च केली गेली तर ती कारभाऱ्यांनी अदा करावी. पण अशाप्रकारे जादा झालेल्या रक्कमेची परतफेड त्यांचे पुढील महिन्याच्या खर्चाच्या मान्य रक्कमेतून वजा केली जात असे.[८१]

प्रतिवर्षी जाहीर केलेल्या अंदाजपत्रकांनुसार खर्च होतो की नाही, हे पडताळण्यासाठी जहागिरीच्या जमाखर्चाची ताळेबंदी वर्षातून

दोन वेळा केली जाई.[८२] यावरून ब्रिटीश कालीन जहागिरीची व्यवस्था लावताना आर्थिक नियोजन काटेकोर आणि नियमबध्द ठेवण्याकडे सरदार पाटणकरांनी लक्ष दिलेले दिसून येते.

**फॉरेस्ट विभाग:**

पाटण जहागिरीमध्ये २३ चौरस मैल जंगल क्षेत्र होते. या जहागिरीच्या अधिपत्याखालील जंगल विभागाचे कोयना खोरे व केरा खोरे असे दोन विभाग पाडले होते. या विभागावर देखरेख करण्यासाठी एक फॉरेस्ट अधिकारी, दोन राऊंड गार्ड व ७ बीट गार्ड नेमलेले होते.[८३] जंगल क्षेत्रापैकी काही जमिनी ९९ वर्षाच्या मुदतीने रयतेस लागवडीसाठी दिल्या जात.[८४] या जंगलात साग, शिसव, चंदन, हिरडा, शिकेकाई अशी झाडे होती. ही झाडे तोडण्यास सरदार पाटणकरांनी बंदी आणली होती. इतर झाडांच्या फक्त फांदया तोडणेस जमीन धारकांना परवानगी असे. तसेच जंगल क्षेत्रातील ओले अथवा वाळलेले गवत, सागाची पाने, काटेरी झुडपे, वेल प्रपंचाच्या उपयोगासाठी मोफत व विना परवाना नेण्यास स्थानिक लोकांना परवानगी होती. मात्र हा माल इतर गावातील रयतेस विकण्यास परवानगी नव्हती.[८५]

जहागिरीच्या २३ मैलाच्या क्षेत्रापैकी काही भाग हा राखीव जंगल म्हणून ठेवण्यात आला होता. यामध्ये मौजे कुसवडे पैकी पद्‌मावतीचा रहाट, गोजेगाव पैकी डबदरा, गोषटवाडी पैकी ऐनाड, दिवशी पैकी आडवण, निकवणे पैकी माहुंदर, जांभळवन, पासोडी या भागाचा समावेश होतो.[८६] तर मौजे म्हावशी, साखरी, मेंढोशी, घाणव, चिटेघर, आंबवणे, तामकणे, चोपडी या गावातील जंगल क्षेत्र हे पूर्णपणे राखीव होते.[८७] या राखीव जंगलातील जमिनी लागवडीसाठी देण्यास बंदी होती. तसे कृत्य आढळून आल्यास संबंधितास कडक शासनासह दंडात्मक कारवाई केली जात असे.

जहागिरीच्या जंगलक्षेत्रात जनावरे चारण्यासाठी चराई कर किंवा फी आकारली जाई. हा कर दरसाल एकवार घेतला जाई. याचे दर पुढीलप्राणे,

| अ.नं. | जनावरे यादी | दर (आण्यामध्ये) |
|---|---|---|
| १ | गाई | २ आणे |
| २ | बैल | २ आणे |
| ३ | म्हैस | ४ आणे |
| ४ | रेडा | ४ आणे |
| ५ | घोडा | ४ आणे |
| ६ | वासरू | २ आणे |
| ७ | रेडकू | २ आणे |
| ८ | मेंढरू | २ आणे[८८] |

वरील प्रमाणे फी भरल्याशिवाय जंगल क्षेत्रात जनावरे चारण्याची मुभा नव्हती. पुढे कालांतराने सरदार पाटणकरांनी जंगलक्षेत्रावरील निर्बंध कमी केलेले दिसून येतात.

**धार्मिक परिस्थिती:**

मानवी जीवनामध्ये समूहशीलतेला विशेष महत्त्व आहे. ज्यावेळी समूहाचे समाजात रूपांतर होत असताना समाजमनावर काही संस्कार होत असतात. या संस्काराचा परिपाक म्हणजे संस्कृती होय. त्याअनुंषगाने धर्म आणि उत्सव हे समाजाचे महत्त्वपूर्ण अंग ठरते. या सण, उत्सवाच्या माध्यमातून सांस्कृतिक—सामाजिक देवाण घेवाण होत असते. या उत्सवामध्ये बहुजन समाजाचे स्थान मोठे होते. पाटण जहागिरीमध्ये रामनवमी, लक्ष्मीदेवी यात्रा, दसरा असे विविध उत्सव पारंपरिक पध्दतीने साजरे केले जात.[८९]

या उत्सवाच्या वेळी आमंत्रण यादया तयार केल्या जात. सरकारी अंमलदार व स्वत: सरदार पाटणकर आमंत्रणे देत. सरकारी नोकर वर्गास हुजूर ऑफिस क्लार्ककडून तर पेठेतील व ब्राह्मणपुरीतील लोकांना मालदारांकडून आमंत्रणे दिली जात.[९०] या उत्सवाचे काटेकोर नियोजन केले जाई. या नियोजनात कोणीही गफलत केली असता, त्यावर कडक कारवाई केली जात.

उत्सवाच्या वेळी सर्व बलुतेदार मंडळी नेमून दिलेली कामे पार पाडत असत. या उत्सवाच्या वेळी भव्य मिरवणुक काढली जायची. या मिरवणुकीत निमंत्रित, ग्रामस्थ तसेच जहागिरीकडील सर्व फॉरेस्ट गार्ड, खजिना गार्ड, पट्टेवाले, मालदार, ताशेवाले, कोतवाल, वाजंत्री आणि सर्व बलुतेदार, अलुतेदार मंडळी सहभागी होत असत.[९१] या मिरवणुकीत घोडेवाले, कोतवाल, ताशेवाले, वाजंत्री, निशाणदार, फॉरेस्ट गार्ड, हुद्देवाले, खजिना गार्ड, पट्टेवाले, नाईक, पालखी, श्रीमंत सरदार पाटणकर, निमंत्रित आणि ग्रामस्थ असा क्रम ठरलेला असायचा. पालखीच्या दोन्ही बाजूस छत्री, अबदागिरी व चौऱ्या धरल्या जायच्या. पालखीसमवेत शिंगवाले, गुरव असायचे.[९२] या मिरवणुकीत जहागिरीच्या नोकर वर्गाने नेमून दिलेला पोशाख म्हणजेच तांबडी अथवा पिवळी डगली, पागोटी व विजार घालण्याची सक्त ताकीद असायची.[९३]

या मिरवणुकीसमयी गार्डकडून बंदूकीचे बार काढले जाई. संपूर्ण पाटण गावातून ही मिरवणूक व्हायची. मिरवणुकीचे विसर्जन समयी प्रसंगान्वये चहापान अथवा भोजनाची व्यवस्था असायची. या मिरवणुकीत जात, पात, पंथ यांना थारा नसे.

**सरदार पाटणकरांचे सामाजिक कार्य:**

**अ. आठवडी बाजार:**

पाटण मध्ये लोकांच्या सोयीसाठी आठवडी बाजाराची सोय करण्यात आली होती. आताच्या शिक्का मॅन्शनच्या समोर दर सोमवारी

आठवडी बाजार भरत असे.[९४] या बाजारासाठी सरदार पाटणकरांनी आपल्या वाडयानजीकची जागा उपलब्ध करून दिली होती. या बाजारपेठेत विविध जिनसांची व सवगांची मिळून अंदाजे १२५ दुकाने होती.[९५] मोठया प्रमाणात वस्तूंची देवाण घेवाण या ठिकाणी होत असे. सरदार पाटणकर घराण्याची धाकटी पाती रामपूर भागात वास्तव्यास होती. याठिकाणी दर शुक्रवारी बाजार भरविला जात असे.[९६]

**ब. लोकोपयोगी कामे व बांधकाम:**

सरदार बाबासाहेब पाटणकरांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून पाटण जहागिरीमध्ये शाळा स्थापन केली होती.[९७] तसेच ब्रिटीश परंपरेनुसार या ठिकाणी पोस्ट ऑफिस, रहदारीचा बंगला, इंग्रज सरकारची मामलेदार कचेरी, मुन्सफ कोर्ट, इंजिनिअर ऑफिस, फॉरेस्ट ऑफिस इ. सरकारी कार्यालये उपलब्ध होती. वैद्यकीय सेवेसाठी आताच्या शिक्का मॅन्शनच्या जवळ सरकारी दवाखाना स्थापन केलेला होता.[९८]

पाटणजवळून कोयना नदी वाहते. पावसाळयांत उतारू लोकांना व शेतकरी यांना जाण्यायेण्याकरितां त्यांनी पाटण येथे नावा व होडयांची सोय केली होती. तसेच नांदणी गांवी पंचगंगा नदीच्या ठिकाणी ही लोकांना ये—जा करण्यासाठी स्वखर्चाने होडया व नावांची सोय केली होती. पिरळ व सावर्डे येथील नदीवर होडया व नावा त्यांनी उपलब्ध करून दिल्या होत्या.[९९]

पाटण जहागिरींस भेट देण्यासाठी आलेले, कामधंदयासाठी आलेले प्रवाशांच्या रात्रीच्या मुक्कामाची कोणतीही सोय त्या काळात नव्हती. ही बाब पाटणकरांच्या लक्षात येताच त्यांनी प्रवासी लोकांसाठी, अंमलदार, कामगार यांच्यासाठी धर्मशाळा व देवालये उभारली होती.[१००] या ठिकाणी प्रवाशी लोकांना लागणारे साहित्य, सामुग्री मिळण्याची सोय करण्यात आली होती. त्यांना अन्न शिजविण्यासाठी आवश्यक भांडी उपलब्ध करून देण्यात

आली होती. या कारणास्तव प्रवासी लोकांना पाटण जहागीर हे सुरक्षित वाटत असल्याचे आपणांस दिसून येते.

सरदार बाबासाहेब पाटणकर यांनी इ.स. १८९१ मध्ये अंदाजे ७० हजार खर्च करून एक वाडा बांधला.[१०१] हा वाडा 'शिक्का मॅन्शन' म्हणून आजही ओळखला जातो. या वाडयाचे बांधकाम रावबहाद्दूर झुंजारराव घाटगे यांच्या देखरेखीखाली करण्यात आले.[१०२] या वाडयाच्या भोवती तटबंदी असल्याने हा वाडा एखादया किल्ल्याप्रमाणे वाटतो. या वाडयात पाच चौक आहेत. दर चौकास पहारे असायचे, वाडयामध्ये चौघडा, कोतवाला पागा, स्वारांची घोडी पागा होती. तसेच दरबार हॉल, जामदारखाना, कोठी या बाबी संस्थानिक परंपरेनुसार आपणांस पहावयास मिळतो.[१०३] त्याचबरोबर जवाहरखाना, दप्तरखाना हे सुध्दा पहावयास मिळतात. याच दप्तरखान्यात सुमारे विविध विषयाची विभागणी केलेले ४२५ रूमाल आहेत.[१०४] बारनिशी, प्रशासकीय, शेरी असे वेगवेगळे विभाग दप्तरखान्यात असलेले दिसून येतात.

**क. दुष्काळनिवारण व उपाययोजनाः**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धाते पाटण जहागिरींमध्ये मोठा दुष्काळ पडला होता. त्यावेळी सरदार बाबासाहेब पाटणकर यांनी जहागिरींमध्ये ठिकठिकाणी अन्नछत्रे उभारून रयतेच्या जेवणाची सोय केली होती. तसेच ठिकठिकाणी धान्य वाटण्याची व्यवस्था केली होती. याकामी त्यांनी बरीच रक्कम खर्च केली होती. त्यांनी योजिलेल्या उपाययोजनांची दखल कोल्हापूरचे पोलिटिकल एजंट अंडरसन व सातारचे कलेक्टरसाहेबांनी घेतलेली होती.[१०५] त्याबाबत बाबासाहेब पाटणकरांचा सन्मान करण्यात आला होता.

पाटण हे सरदार पाटणकरांच्या गतविधीचे मुख्य केंद्र असल्याने खासगी कारभारी, मानकरी, अव्वल कारकून, जंगल कामगार यांचे वास्तव्य या ठिकाणी होते. त्यामुळे पाटणची लोकसंख्या वाढत गेलेली होती. या

लोकसंख्येसाठी पाटण येथील जुन्या पारंपरिक विहिरीचा वापर पिण्याच्या पाण्यासाठी केला जात होता. परंतु वर्षभर या विहिरीचे पाणी पुरत नसे. त्यामुळे बाबासाहेब पाटणकर यांनी पाच हजार रूपये खर्च करून नवीन विहीर बांधली.[१०६] आजही या दोनही विहिरी चांगल्या स्थितीत असल्याचे पहावयास मिळतात.

**सरदार पाटणकर आणि त्यांचे विविध घराण्यांशी असलेले संबंध:**

**अ. कोल्हापूरचे छत्रपती घराणे:**

कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज यांनी राजश्री रामराव पाटणकरांचे चिरंजीव नागोजीराव पाटणकर यांना सोयरिकीविषयी पाठविलेले दिनांक ४ फेब्रुवारी, १७४२चे पत्र उपलब्ध आहे.[१०७] परंतु याबाबत पुढे काय घडले याबाबत अधिक माहिती उपलब्ध नाही. ही सोयरिक जुळून आली किंवा नाही, याबाबत अधिक माहिती नाही. पुढे दिनांक २१ जून, १८०८ मध्ये कोल्हापूरचे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांची कन्या चिमाबाई आक्कासाहेब यांचा विवाह सरदार नागोजीराव पाटणकर यांच्याशी संपन्न झाला.[१०८] कोल्हापूरचे छत्रपती शहाजी महाराज पहिले ऊर्फ बुवासाहेब यांची कन्या आऊबाई आक्कासाहेब यांचा विवाह पाटण घराण्यातील सरदार रामचंद्रराव पाटणकर यांच्याशी इ.स. १८४६मध्ये झाला.[१०९] त्यांना इ.स. १८५० मध्ये एक पुत्र झाला. त्यांना कोल्हापूरचे छत्रपती शिवाजी ऊर्फ बाबासाहेब महाराज यांनी पुत्रसंतती नसल्याने इ.स. १८६६मध्ये दत्तक घेतले आणि त्यांचे छत्रपती राजाराम महाराज असे नामकरण केले. तसेच इ.स.१८२६ मध्ये छत्रपती बुवासाहेब महाराज यांनी पाटण जहागिरींस भेट दिली होती.

**आ. कागलचे घाटगे घराणे:**

सरदार पाटणकर घराण्यातील बाजीराव पाटणकर जे नागपूरचे मुधोजी भोसले यांच्याकडे सेवा बजावत होते. कालांतराने दुसरे बाजीराव

पेशवे यांनी त्यांना पुणे येथे आणले. त्यांची कन्या सुंदराबाई ऊर्फ नानीसाहेब यांचा विवाह कागलचे जहागीरदार सखारामराव घाटगे सर्जेराव यांचेशी झाला.[११०]

या विवाहानंतर कागलचे घाटगे आणि पाटणचे पाटणकर यांचे ऋणानुबंध तयार झाले. ते आजतागायत आहेत. कोल्हापूर राज्यात ही दोन मातब्बर घराणी या विवाहबंधनामुळे एकमेकांच्या जवळ आली. त्यांच्या या संबंधांचा फायदा दोन्ही घराण्यांना झालेला दिसून येतो.

**इ. ग्वाल्हेर शिंदे घराणे:**

कागल घराण्यातील सखारामराव घाटगे यांना जयसिंगराव आणि बायजाबाई अशी दोन अपत्ये होती. बायजाबाई ही रूपसंपन्न असल्यामुळे कित्येक इतिहासकारांनी दक्षिणची सौंदर्यलतिका (Beauty of the Deccan) अशी संज्ञा दिली आहे.[१११] तिचा विवाह दिनांक २६ फेब्रुवारी, १७९८ मध्ये ग्वाल्हेरचे महाराजा श्रीमंत दौलतराव शिंदे यांच्याशी पुणे येथे संपन्न झाला.[११२] या उभयतांच्या कन्येचा विवाह पाटणकर घराण्यांतील मानसिंगराव पाटणकर यांचे पुत्र रामचंद्रराव ऊर्फ आप्पासाहेब पाटणकर यांच्याशी इ.स. १८१६मध्ये झाला.[११३] पुढे रामचंद्रराव पाटणकर हे ग्वाल्हेरमध्ये राहू लागले. अशा रीतिने ग्वाल्हेरमध्येही सरदार पाटणकर घराण्याचा वंशविस्तार झालेला दिसून येतो.

मध्ययुगीन कालखंडातील ग्वाल्हेरचे शिंदे घराणे हे आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर महाराष्ट्रातील तसेच देशातील एक महत्त्वाचे घराणे होते. या घराण्याशी वैवाहिक संबंध कागल घराण्याने जरी प्रथमतः प्रस्थापित केले तरीही नंतरच्या काळात सरदार पाटणकर घराण्यातील रामचंद्रराव पाटणकर यांनी शिंदे दरबारी राहून केलेल्या पराक्रमाच्या जोरावर त्यांनी शिंदे घराण्याची मर्जी संपादन केली होती. याचा फायदा असा झाला की, सौ.बायजाबाई शिंदे यांनी सरदार रामचंद्रराव पाटणकरांना आपला जावई म्हणून पसंद केले होते. तसेच त्यांना शिंदे घराण्यांकडून अनेक मानसन्मान प्राप्त झाले होते.

**ई. फलटणचे निंबाळकर घराणे:**

पाटण जहागिरीस कोल्हापूर आणि सातारा छत्रपतींनी भेट दिल्यानंतर सरदार पाटणकर घराण्याचे महत्त्व महाराष्ट्रभर वाढल्याचे दिसून येते. यातून फलटणचे निंबाळकर हे सुध्दा सरदार पाटणकर घराण्यांशी वैवाहिक संबंध प्रस्थापित करू पहात होते. यातून सरदार पाटणकर घराण्यातील व्यंकटराव पाटणकर यांचा विवाह फलटणचे श्रीमंत शिदोजीराव ऊर्फ आप्पासाहेब निंबाळकर यांची कन्या तानीबाई ऊर्फ लक्ष्मीबाई यांचेशी इ.स. १८३३ मध्ये झाला. [११४]

**उ.तळेगांव दाभाडे येथील सरदार दाभाडे घराणे:**

खंडेराव दाभाडे यांनी जिंजी मुक्कामी छत्रपती राजाराम महाराजांची एकनिष्ठ सेवा केली होती. तेव्हा छत्रपती राजाराम महाराजांनी खंडेराव दाभाडे यांस दाभाडे गाव इनाम दिले होते. नंतरच्या काळात छत्रपती शाहू महाराजांनी दिनांक ११ जानेवारी, १७१७ मध्ये खंडेराव दाभाडे यांस सरसेनापतीपद देऊन चाकण व पारनेर अशा जहागिऱ्या दिल्या. सरसेनापती खंडेराव दाभाडे आणि उमाबाई दाभाडे यांचे तिसरे अपत्य दुर्गाबाईसाहेब यांचा विवाह पाटणच्या सरदार पाटणकर कुटूंबात झाला होता.

**ऊ.वाळव्याचे थोरात घराणे:**

सरदार पाटणकर घराण्यातील जोत्याजीराव ऊर्फ नागोजीराव पाटणकर यांचा विवाह वाळव्याचे जहागिरदार आणि कोल्हापूर राज्यातील प्रतिष्ठित सरदार श्रीमंत नारायणराव थोरात—वाळवेकर यांची कन्या माईसाहेब यांचेशी इ.स. १८६२ मध्ये संपन्न झाला.[११५] या विवाहामुळे कोल्हापूर दरबारात पाटणकरांचे वर्चस्व वाढलेले दिसते.

**ए.सावर्डेचे सावर्डेकर घराणे:**

सरदार पाटणकर घराण्यातील जोत्याजीराव ऊर्फ नागोजीराव पाटणकर यांचा द्वितीय सावर्डेकर इनामदार दिनकरराव सावर्डेकर यांच्या कन्येशी झाला.[११६]

**ऐ.सावंतवाडीचे घाडगे थोरात घराणे:**

सरदार पाटणकर घराण्यातील जोत्याजीराव ऊर्फ नागोजीराव पाटणकर यांचा तृतीय विवाह इ.स. १८७७ मध्ये सावंतवाडीचे सरदार बापुसाहेब घाडगे यांच्या कन्येशी झाला.[११७]

**ओ. सावंतवाडीचे सावंत-भोसले घराणे:**

सावंतवाडीच्या घराण्यातील श्रीमंत दत्ताजीराव रावसाहेब भोसले संस्थान हेरे यांच्याशी जोत्याजीराव पाटणकर यांची कन्या आक्कासाहेब यांचा विवाह इ.स. १८८१ मध्ये झाला.[११८]

**औ. कुठरेचे मलेकर इनामदार ऊर्फ राजेशिर्के घराणे:**

पाटणकर घराण्यातील जोत्याजीराव ऊर्फ नागोजीराव पाटणकर यांचा चतुर्थ विवाह मौजे कुठरे, तालुके चिपळूण, जिल्हा रत्नागिरी येथील श्रीमंत आप्पासाहेब राजेशिर्के यांच्या कन्या गजराबाईसाहेब यांचेशी इ.स. १८७८मध्ये झाला.[११९]

छत्रपती शहाजी महाराज सातारच्या गादीवर आल्यावर त्यांनी इ.स. १८४३ ला बळंवतराव भोसले यांना पंत राजाज्ञा पद देऊन एक भालदार नेमणूकीस दिला.[१२०] या बळंवतराव भोसले यांचा द्वितीय विवाह पाटणकर घराण्यातील कन्येशी झाला.[१२१] परंतु त्यांच्या नावाचा उल्लेख आढळत नाही.

थोडक्यात, वरील विवाहसंबंधातून असे दिसून येते की, सरदार पाटणकर घराण्यांशी तत्कालिन महाराष्ट्रातील प्रसिध्द घराण्यांनी संबंध जोडलेले दिसून येतात. या घराण्याचा प्राचीन वारसा आणि वसा, युध्दसंघटन, परंपरा, त्यांनी आजतागायत जोपासलेली संस्कृती अशा विविध कारणांमुळे या घराण्यांशी वैवाहिक संबंध प्रस्थापित करण्याची जणू चढाओढ आपणांस पहावयास मिळते. या वैवाहिक संबंधामुळे सरदार पाटणकर यांचा मध्ययुगीन संस्थानिकपणाचा रूबाब आपणास दिसून येतो.

**सारांशः**

ब्रिटीश कालखंडात सरदार पाटणकर घराणे प्रत्यक्ष युध्दभूमीवर लढताना दिसत नसले तरी पाटण जहागिरींच्या माध्यमातून त्यांनी अनेक समाजोपयोगी, लोकहिताची कामे केलेली दिसून येतात. त्यांच्या केलेल्या कामाची दखल खुद्द ब्रिटीश अधिकाऱ्यांनी म्हणजेच सातारा जिल्हयाचे कलेक्टर यांनी घेतलेली दिसून येते. कोल्हापूर तसेच सातारा राज्याचे छत्रपती यांनी ही पाटण जहागिरीस वारंवार भेट देऊन त्यांच्यावर शिवकालापासून असलेला विश्वास पुढे चालू ठेवला.

पाटण जहागिरीतील लोकांच्या गरजा लक्षात घेऊन अनेक उपक्रम सरदार पाटणकरांनी राबविलेले दिसून येतात. प्रत्यक्षात जहागिरींचा उपभोग घेत असताना सर्वांना एकत्रित करून तसेच सोबत घेऊन जहागिरीचा विकास करण्याचा प्रयत्न ब्रिटीश कालखंडामध्ये सरदार पाटणकरांनी केलेला दिसून येतो. ग्रामसुधारणेच्या दृष्टीने सरदार पाटणकरांनी आपल्या जहागिरीतील खेडेगावातून फार मोठे कार्य केलेले दिसून येते.

पाटण जहागिरीतील अनेक गावातील रयतेच्या वैयक्तित अडचणी तसेच सार्वजनिक अडचणी सोडविण्यातही त्यांनी पुढाकार घेतला होता. दुष्काळनिवारण करण्यासाठी त्यांनी स्वखर्चाने काही उपाययोजना

केल्या होत्या. त्यांनी केलेल्या उपाययोजना आजही आपणांस पाटण मध्ये पहावयास मिळतात. शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी पाटण गावांमध्ये शाळेची स्थापना केली होती. तसेच आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने सरकारी दवाखान्याची उभारणी केली होती.

पाटण जहागिरीचे व्यवस्थापन उत्कृष्टरीत्या करून तत्कालिन इतर जहागीरदारांपुढे आदर्श निर्माण केला होता. ब्रिटीश आमदानीतील अनेक गोष्टींचा त्यांनी उपयोग करून घेतला होता. ब्रिटीश धर्तीवर विविध विभाग सुरू करून या जहागिरीच्या उन्नतीसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले होते. त्यांना लाभलेल्या या जहागिरीच्या व्यवस्थापनासाठी नोकरदार वर्गाची रचना केली होती. यामुळे सरदार पाटणकर आणि रयतेमध्ये संवाद निर्माण होऊन या संवादांच्या माध्यमातून रयतेस होणाऱ्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला होता. रोख पगार तसेच महसूली कामगार वर्ग यांच्यात समन्वय निर्माण करून पाटण जहागिरीचा कारभार आदर्शवत केला. शेरी, बारनिशी यांचे दप्तर निर्माण करून सर्व कागदपत्रे व्यवस्थितरीत्या जतन केलेले दिसून येते.

फॉरेस्ट विभागाचे ब्रिटीश धर्तीवर योग्य नियोजन करून जमिनी तसेच झाडांची योग्य निगा आणि सरंक्षण करण्याची नीती सरदार पाटणकरांनी आखलेली दिसून येते. तसेच गवतांची कुरणे, राखीव जंगले याबाबत कडक धोरणे आखल्यामुळे डोंगरी विभागात असलेला पाटण तालुका पुढील काही वर्षामध्ये नैसर्गिक साधनसामुग्रीने संपन्न असलेला दिसून येतो.

१८व्या शतकापासून क्षात्रतेज दाखवित असलेले पाटणकर घराणे शिवकाल, पेशवेकाळात उत्कर्ष करताना दिसून येते. प्रत्यक्ष युध्दभूमीवर जास्तीत जास्त वेळ घालविल्यामुळे या घराण्यांतील पुरूषांना पाटण जहागिरींकडे जास्त लक्ष देता आले नाही. परंतु ब्रिटीश कालखंडामध्ये त्यांनी पाटण जहागिरीचा शांततेने उपभोग घेतलेला दिसून येतो. या जहागिरीत मोठया प्रमाणात

सुधारणा घडवून आणण्याचे धोरण त्यांनी स्वीकारलेले दिसते. त्यामुळे पाटण जहागिरीविषयी खुद्द सातारा आणि कोल्हापूरच्या छत्रपतींबरोबरच इतर महत्त्वाच्या सरदारांना आकर्षण असलेले दिसून येते.

शांततेच्या या काळात त्यांनी अनेक घराण्यांसोबत वैवाहिक संबंध प्रस्थापित करून कोल्हापूर तसेच संस्थानातील आपले स्थान भक्कम केल्याचे दिसून येते. प्रारंभी सातारा छत्रपतींशी एकनिष्ठ असलेले हे घराणे, नंतरच्या काळात पेशव्यांकडे आणि मराठी सत्तेच्या उत्तरार्धात ते कोल्हापूरच्या सरलष्कर पदापर्यंत पोहचलेले दिसून येतात. याच काळात कोल्हापूरच्या छत्रपती घराण्यांशी त्यांचे वैवाहिक संबंध प्रस्थापित झाल्याने ते कोल्हापूर छत्रपतींच्या खूप जवळचे व खास मर्जीतले झाले होते.

सरदार पाटणकर घराण्याला जिथे संधी मिळाली, तिथे त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर आपले स्थान बळकट केले होते. राज्यकारभाराच्या सोयीसाठी सरदार पाटणकरांनी आपला वंशविस्तार केलेला दिसून येतो. यातून त्यांनी ग्वाल्हेर येथे पाटणकर घराण्याचा विस्तार झालेला दिसून येतो. कागल, ग्वाल्हेर, तळेगांव दाभाडे, फलटण, सावंतवाडी, सावर्डे, वाळवा, कुठरे येथील घराण्यांशी त्यांनी वैवाहिक संबंध प्रस्थापित केल्याचे दिसून येते. किंबहुना, या प्राचीन संस्कृती, परंपरा असलेल्या घराण्यांशी वैवाहिक संबंध प्रस्थापित करून सरदार पाटणकर घराण्यांचे मोठेपण अधोरेखित होताना आपणांस दिसून येते.

## -: टीपा व संदर्भ :-


१) प्रा.डी.डी.चव्हाण, *‘क्षत्रिय कुलावतंस चालुक्य–सोळंखी–साळुंखे ऊर्फ श्रीमंत सरदार पाटणकर घराण्याचा इतिहास’*, श्रीराम प्रकाशन, पाटण, सुधारित द्वितीय आवृत्ती, ८ एप्रिल, २०१४, पान नं. १६९.

२) कित्ता.

३) कित्ता.

४) कित्ता.

५) विनायक लक्ष्मण भावे, *‘लेखांक १, रूमाल १, मराठी दफ्तर, श्रीमंत महाराज भोसले यांची बखर’,* अरूणोदय प्रकाशन, ठाणे, शके १८३९, पान नं. १५४

६) कित्ता, पान नं. १६३.

७) रू.क्र.१, पु.क्र.४, सरदार पाटणकर दप्तर, मुंबई पुराभिलेखागार विभाग, मुंबई.

८) कित्ता.

९) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १३७.

१०) कित्ता.

११) कित्ता.

१२) कित्ता.

१३) कित्ता.

१४) कित्ता.

१५) सुनिल द. दापुरकर, *‘श्रीमंत सरदार पाटणकर हुजुरवाडेकर (चाालुक्य ऊर्फ साळुंखे) क्षत्रिय कुळाचा इतिहास व ऐतिहासिक कागदपत्रे’*, गगनगिरी प्रकाशन, गगनगिरी, प्रथमावृत्ती, २००३, पान नं. ७३.

१६) Savant Waree-Memoir, Page No.32.

१७) www.google.com/wiki

१८) पत्र क्र. ९२२, सेनापती दप्तर, दिनांक ०४ मार्च, १८४६.

१९) कित्ता.

२०) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १३८.

२१) कित्ता.

२२) कित्ता, पान नं. १३९.

२३) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. ७१.

२४) कित्ता.

२५) कित्ता, पान नं. ११५.

२६) कित्ता.

२७) कित्ता.

२८) कित्ता.

२९) मुलाखत, श्री.याज्ञसेन विक्रमसिंह पाटणकर.

३०) कित्ता.

३१) कित्ता.

३२) कित्ता.

३३) कित्ता.

३४) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. ७२.

३५) कित्ता, पान नं. ११६.

३६) स्टॅटिस्टिकल रिपोर्ट, मुंबई सरकार, १८५४, पान नं. ३०२.

३७) पूर्वोक्त, मुलाखत, श्री.या.वि.पा.

३८) कित्ता.

३९) कित्ता.

४०) कित्ता.

४१) कित्ता.

४२) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. ११७.

४३) कित्ता.

४४) पूर्वोक्त, मुलाखत, श्री.या.वि.पा.

४५) कित्ता.

४६) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १३९.

४७) कित्ता.

४८) कित्ता.

४९) कित्ता.

५०) कित्ता, पान नं. १५१.

५१) कित्ता, पान नं. १५२.

५२) कित्ता, पान नं. १५३.

५३) कित्ता.

५४) कित्ता.

५५) कित्ता.

५६) कित्ता.

५७) ठराव नं. २४३८, मुंबई सरकार, १८६८.

५८) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १५४.

५९) कित्ता.

६०) कित्ता, पान नं. १५५.

६१) नं. ३४७२, सातारा कलेक्टर गॅझेट, पान नं. ६६४.

६२) पूर्वोक्त, मुलाखत, श्री.या.वि.पा.

६३) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १६०.

६४) कित्ता.

६५) कित्ता.

६६) कित्ता.

६७) दि.मु.जा. ४०१, आभार प्रदर्शन यादी, सातारा कलेक्टर.

६८) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १५७.

६९) कित्ता.

७०) कित्ता.

७१) पृ. १८१, शिवकालीन कागदपत्रे, संपा.श्री.व्ही.जी.खोबरेकर, मुंबई पुराभिलेखागार विभाग, मुंबई.

७२) इनाम कनिशन, रू.क्र. ३५० (अ), शराकती दुमलादार रेकॉर्ड, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

७३) पूर्वोक्त, मुलाखत, श्री.या.वि.पा.

७४) कित्ता.

७५) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १५८.

७६) कित्ता, पान नं. २०१.

७७) पूर्वोक्त, मुलाखत, श्री.या.वि.पा.

७८) कित्ता.

७९) कित्ता.

८०) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. २०३.

८१) रेकॉर्ड जावक नं. २/४६, पाटणकर दप्तर, पाटण, दि. ०१ जुलै, १९३५.

८२) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. २०४.

८३) कित्ता.

८४) कित्ता.

८५) कित्ता.

८६) कित्ता.

८७) पूर्वोक्त, मुलाखत, श्री.या.वि.पा.

८८) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ,* पान नं. २०५.

८९) पूर्वोक्त, मुलाखत, श्री.या.वि.पा.

९०) कित्ता.

९१) कित्ता.

९२) कित्ता.

९३) कित्ता.

९४) कित्ता.

९५) कित्ता.

९६) कित्ता.

९७) कित्ता.

९८) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ,* पान नं. १६३.

९९) कित्ता, पान नं. १६०.

१००) पूर्वोक्त, मुलाखत, श्री.या.वि.पा.

१०१) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ,* पान नं. १६२.

१०२) कित्ता.

१०३) पूर्वोक्त, मुलाखत, श्री.या.वि.पा.

१०४) कित्ता.

१०५) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ,* पान नं. १६०.

१०६) पूर्वोक्त, मुलाखत, श्री.या.वि.पा.

१०७) रू.क्र. १, पु.क्र.१, पत्र क्र. १९, सरदार पाटणकर दप्तर, मुंबई पुराभिलेखागार विभाग, मुंबई.

१०८) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ,* पान नं. १३६.

१०९) पत्र क्र. ९२२, सेनापती दप्तर, दिनांक ०४ मार्च, १८४६.

११०) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ,* पान नं. १७०.

१११) पूर्वोक्त, मुलाखत, श्री.या.वि.पा.

११२) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १७०.

११३) कित्ता.

११४) कित्ता, पान नं. १३७.

११५) कित्ता, पान नं. १५३.

११६) कित्ता, पान नं. १५४.

११७) कित्ता.

११८) कित्ता, पान नं. १५३.

११९) कित्ता, पान नं. १५४.

१२०) पूर्वोक्त, विनायक लक्ष्मण भावे, *'ले.१,रू.१,म.द.,श्री.म.भो.यां.ब.'*, पान नं. १७०

१२१) कित्ता, पान नं. १७२.